दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

२७ फेब्रुवारी मराठी भाषा गौरव दिन

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शुक्रवार दि.२७ फेब्रुवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १८३ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Friday 27 Feburary 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 183 | Pages 4 | Rate 4 Rs

# ग्रामीण राजकारणात ऐतिहासिक बदल

## जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये आता 'स्वीकृत सदस्यांची' वर्णी

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या धर्तीवर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येही स्वीकृत सदस्य नियुक्त करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांनंतर, शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांप्रमाणेच ग्रामीण भागातही पक्षीय संख्याबळाच्या आधारावर या सदस्यांची निवड केली जाणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयावर अधिकृत शिक्कामोर्तब झाले असून, यामुळे ग्रामीण राजकारणाला एक नवी दिशा मिळणार आहे.या नवीन नियमानुसार, जिल्हा परिषदेत एकूण सदस्य संख्येच्या १० टक्के, तर पंचायत समितीमध्ये २० टक्के स्वीकृत सदस्य निवडण्याची मुभा मिळणार आहे. यामध्ये किमान ५ सदस्य निवडणे बंधनकारक असून, या संपूर्ण प्रक्रियेसाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात आवश्यक सुधारणा केल्या जाणार आहेत. या संदर्भातील विधेयक लवकरच विधिमंडळात मांडले



जाईल, ज्यामुळे या निर्णयाला कायदेशीर स्वरूप प्राप्त होईल आणि स्थानिक प्रशासनात तज्ज्ञ व्यक्तींना संधी मिळेल.महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली होती, ज्याला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामविकास विभागाला कार्यवाहीच्या सूचना दिल्या होत्या. ग्रामीण भागातील राजकीय समीकरणे आणि प्रशासकीय सक्षमीकरण लक्षात घेता हा निर्णय अत्यंत कळीचा मानला जात आहे. मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती स्तरावरही स्वीकृत सदस्यांच्या निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.ग्रामीण भागात समाजाभिमुख कार्य करणाऱ्या मात्र प्रत्यक्ष निवडणूक लढवणे शक्य नसलेल्या सक्षम कार्यकर्त्यांना विकास प्रक्रियेत सामावून घेण्याच्या उदात्त हेतूने महायुती सरकारने हा निर्णय घेतला असून, यामुळे आता अनेक अभ्यासू आणि पात्र इच्छुकांना जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीच्या सभागृहात अधिकृतपणे प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे.

# राजर्षी शाहू विद्या मंदिर केज येथे स्वयंशासन दिन उत्साहात साजरा

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

येथील स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित राजर्षी शाहू विद्या मंदिर या शाळेत नुकताच 'स्वयंशासन दिन' मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शाळेची धुरा सांभाळत प्रशासकीय आणि शैक्षणिक कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. सर्व प्रथम राजर्षी शाहू महाराज व सावित्रीबाई फुले यांना वंदन करून शालेय कामकाजाची सुरुवात करण्यात आली.शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती बी. बी. चाटे यांनी या उपक्रमाचे महत्त्व नमूद केले व म्हणाल्या की, स्वयंशासन दिनामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित होतात आणि त्यांना शिक्षकांच्या कार्याची जाणीव होते.स्वयंशासन दिनाचे औचित्य साधून इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी शाळेची संपूर्ण जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली होती. सकाळी परिपाठापासून ते शाळा सुटेपर्यंत या विद्यार्थ्यांनी इयत्ता पहिली ते सहावीपर्यंतच्या वर्गांवर पूर्ण वेळ अध्यापनाचे कार्य केले.



गणिताची सूत्रे असोत वा भाषेतील व्याकरण, या बालशिक्षकांनी अतिशय आत्मविश्वासाने आपले विषय मांडले.या दिवसाचे विशेष आकर्षण म्हणजे शाळेच्या कामकाजाचे नियोजन. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती बी. बी. चाटे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राची सुरेंद्र शिंदे हिने 'विद्यार्थिनी मुख्याध्यापिका' म्हणून पदभार स्वीकारला व पूर्ण वेळ कामकाज पाहिले. तिने संपूर्ण शाळेचे नियंत्रण, वर्गांचे वेळापत्रक आणि शिस्तीचे चोख पालन केले. या उपक्रमाला शाळेतील ज्येष्ठ शिक्षक व्ही. बी. यादव,ए. डी. देशमुख,आर. एस. क्षीरसागर,जि. बी. डिरंगे,जे. आर. मस्के,अनिता जाधव व ध्वजा गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य लाभले.शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या अध्यापन कौशल्याचे कौतुक केले आणि त्यांना मोलाच्या सूचना दिल्या. दिवसभराच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. स्वतः शिकवताना मिळणारा आनंद आणि जबाबदारीची जाणीव यामुळे हा दिवस विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरला.

# तिर्थक्षेत्र मोग-यात पंढरी अवतरली रविवारी अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता


**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील तिर्थक्षेत्र मोगरा येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तथा श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा मागील बारा वर्षापासुन आयोजित केला जातो. यंदाही दि. २२ फेब्रुवारीपासुन सप्ताहास सुरूवात झाली असुन विवीध धार्मिक कार्यक्रमांनी पंढरी अवतरल्याचे चित्र निर्माण झाले आहे. दि. १ मार्च २०२६ रविवारी ह.भ.प. तुकाराम म. शास्त्री यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे.



तालुक्यातील तिर्थक्षेत्र मोगरा येथे ह.भ.प. तुकाराम म. शास्त्री, शि. भ. प. शिवाजी म. भरडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात कथा प्रवक्ते ह.भ.प. बाळु म. उखळीकर हे असुन तबला साथ दौलत म. वगरे, हार्मोनियम वादक परमेश्वर महाराज, गायक ह.भ.प. शिवाजी म. देवकते, बुलबुल वादक जय म. सकळकर यांची साथसंगत आहे. ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व ह.भ.प. सौ. बबीताताई महालिंग भरडे, सौ. सुनिता सतिष पांचाळ, सौ. सरोजताई सुधाकर गोसावी, काकडा नेतृत्व ह.भ.प. गोपाळ म. देशमुख, शाहुराव सातपुते, बाबुराव शेजुळ, दौलत म. वगरे, रामहारी शिंदे, संदिपान माकले, विठ्ठल पांढरपोटे, नवनाथ सावंत, सतिष पांचाळ, चत्रभुज खामकर, महालिंग भरडे, नवनाथ इंगळे, श्रीपती नाईकनवरे, खंडु मोरे, महादेव सावंत, श्रीहरी शिंदे हे तर हरिपाठ नेतृत्व ह.भ.प. सचिन म. काष्टे, दौलत म. वगरे, उमेश. हाके हे करत आहेत. यात पहिल्या दिवशी ह.भ.प. कालिदास म. नाईकनवरे यांचे तर ह.भ.प. अनिल म. माखले, ह.भ.प. माउली म. खडकवाडीकर, ह.भ.प. भागवत म. नखाते, ह.भ.प. राजेंद्र म. गोंदीकर यांचे हरिकिर्तन झाले असुन ह.भ.प. सोनालीताई फडके, ह.भ.प. मुकूंद महाराज गात यांचे हरिकिर्तन होणार आहे तर दि. १ मार्च २०२६ रविवारी ह.भ.प. तुकाराम म. शास्त्री यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असुन या महाप्रसादाचा लाभ भाविक - भक्तांनी घ्यावा असे आहे संतोष शेठ दुगड बंधु व समस्थ ग्रामस्थ मोगरा यांचे वतीने करण्यात आले आहे तर पंचक्रोषीतील अनेक भावीक भक्त, महिला, पुरूष मंडळी या सत्संगाचा लाभ घेत आहेत.

# अवकाळी पावसामुळे वैरागड परिसरात फळ भाजीपाला पिकांचे नुकसान



**दैनिक वादळ वार्ता**
**वैरागड। प्रतिनिधी**

दि. २३ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी आलेल्या अवकाळी पाऊसामुळे वैरागड आणि परिसरातील झाडावरील फळांचे, विटा व्यावसायिकांचे, भाजीपाला शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.

संध्याकाळी विजेचा कडकडाट, वादळ वाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसाने वैरागड आणि परिसरात विटा बनविणारे विटा व्यवसिकाचे विटा भट्टी पावसात भिजल्याने विटांचे नुकसान होऊन विटा व्यवसायीकांना फटका बसला आहे. तसेच पावसामुळे विटा भट्टीवर काम करणाऱ्या मजुरांच्या मजुरीवर परिणाम पडला आहे. त्याचप्रमाणे आंब्याच्या झाडावर लागलेले लहान फळ आणि मोहर गळून पडल्याने यावेळी आंबे महाग होण्याची शक्यता आहे. वैरागड आणि परिसर जंगल व्याप्त असल्याने अवकाळी पाऊसाने जंगलातील रानमेवा फळ गळून पडले. अचानक आलेल्या अवकाळी पाऊसाने गाव चिखलमय होऊन जनजीवन विस्कळीत झाले आहे. रब्बी हंगामातील पिके भाजीपाल्यासही फटका बसला आहे.

# राज्यातील खासगी व धर्मादाय रुग्णालयांना शासकीय आरोग्य योजना राबविणे बंधनकारक-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । उदय नरे**

राज्यातील खासगी व धर्मादाय रुग्णालयांनी केंद्र आणि राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची अंमलबजावणी करणे बंधनकारक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

आमदार भिमराव तापकीर यांनी मांडलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शासनाने धर्मादाय रुग्णालयांची नवीन सवलतीची व्याख्या तयार केली असून त्या अनुषंगाने अनेक रुग्णालये आता धर्मादाय श्रेणीत येतात. या रुग्णालयांनी गरीब व गरजू रुग्णांसाठी राखीव खाटा आणि निधीबाबत पारदर्शकता ठेवणे आवश्यक आहे. रुग्णालयांमधील उपलब्ध खाटा आणि रुग्णांवरील खर्चाची अचूक माहिती मिळावी म्हणून शासनाने डायनॅमिक डॅशबोर्ड तयार केला आहे. या माध्यमातून प्रत्येक रुग्णालयातील खाटांची माहिती,



त्यावरील खर्च, आणि धर्मादाय निधीचा उपयोग आदी माहिती कोणत्याही वेळेत पाहता येईल.पूर्वी रुग्णालये केवळ खर्च दाखवायची, पण प्रत्यक्ष सेवा देतात की नाही याची खात्री नव्हती. आता निश्चित दर (रेट्स) शासनाने वाढवून दिले आहेत आणि त्या दरानुसारच रुग्णालयांना सेवा द्यावी लागेल. प्रत्येक रुग्णालयाने आपल्या बेडचा दर सार्वजनिकपणे घोषित करणे अनिवार्य असेल. तसेच रुग्णालयांनी त्यांच्या एकूण निधीपैकी २ टक्के रक्कम धर्मादाय सेवेसाठी वापरणे बंधनकारक आहे. मात्र आतापर्यंत या निधीचा अचूक वापर दिसून येत नव्हता. या अधिवेशनात कायद्यात सुधारणा करून हा २ टक्के निधी डॅशबोर्डवर दिसेल, ज्यातून कोणत्या रुग्णावर किती खर्च झाला हे स्पष्ट होईल. या संदर्भातील काही मुद्दे उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. न्यायालयाने विधी व न्याय विभागाला रुग्णालयांची बाजू ऐकून निर्णय घेण्याचे निर्देश दिले असून, शासनाचे मत स्पष्ट आहे की, सर्व धर्मादाय रुग्णालयांनी केंद्र व राज्याच्या आरोग्य योजना तसेच राखीव खाटा व निधी पारदर्शकपणे लागू कराव्यात, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.पहिल्यांदाच राज्य शासनाकडे प्रत्येक रुग्णालयाच्या बेडची अद्ययावत माहिती उपलब्ध आहे. पुढील दुरुस्ती नंतर ही प्रणाली अधिक सक्षम आणि पारदर्शक होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.या प्रश्नाच्या चर्चेत राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, विधानसभा सदस्य विजय वड्डेटीवार, आमिन पटेल,प्रशांत बंब यांनी सहभाग घेतला.

# संपादकीय

## सातत्यपूर्ण पाठबळ हवे

आयटी क्षेत्रासाठी यंदाचा अर्थसंकल्प सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना यामुळे हे क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनामध्ये आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल.भारतात आयटी क्षेत्राचा विस्तार वेगाने झाला. भारतातील या क्षेत्राची गेल्या पंचवीस वर्षांमधली प्रगती जुन्या-जाणत्यांनाही चकीत करणारी आहे. या क्षेत्राने दिलेल्या संधींचा फायदा घेत भारतीय तरुणाईने यशाची नवी शिखरे सर केलीच, पण समृद्धीही मिळवली. आज हे भारताच्या प्रगतीच्या प्रवासातले महत्त्वाचे क्षेत्र ठरते आहे. देशाच्या अर्थकारणात या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. कोणतेही उत्पादन न देता सेवेच्या बळावर हे क्षेत्र प्रगती करत आहे. अर्थात हार्डवेअर क्षेत्राचाही या ना त्या प्रकारे संबंध येत असल्याने एकूणच आयटी आणि संगणक क्षेत्र देशात हातात हात घालून प्रगती करत आहेत. त्यामुळेच या क्षेत्रातील घडामोडी, बदलत्या सरकारी तरतुदी, अमेरिकेसारख्या भल्या मोठ्या देशाचा या क्षेत्राच्या अर्थकारणात असणारा सहभाग महत्वाचा ठरतो. किंबहुना, अमेरिकेत सर्दी झाली तरी भारतात हुडहुडी भरते, असा प्रकार अनुभवायला मिळतो. असे अनेक घटक तपासत, समजून घेत आणि त्यांचा प्रभाव अनुभवत भारत या क्षेत्रातील वाटचाल सूकर करत असतो. गेले काही दिवस अमेरिका आणि भारताचे सातत्याने बदलत, वर-खाली होत असलेले संबंध आयटी क्षेत्रात तरंग उमटवत आहेत. कदाचित म्हणूनच व्हिसा किंवा नागरिकत्व देण्याच्या अमेरिकेच्या धोरणाबरोबरच भारतातील आर्थिक धुरीण या क्षेत्राच्या प्रगतीकडे कसे बघतात, त्याच्या समोर असलेल्या आव्हानांचा मागोवा कसा घेतात हे बघणे महत्वाचे ठरते. अमेरिकेत डोनाल्ड ट्रंप अध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून हे क्षेत्र काही विक्षिप्त निर्णयांना आणि तरतुदींना सामोरे जात आहेच, पण सातत्यपूर्ण बदलही अनुभवत आहे. त्याचेच प्रतिबिंब ताज्या अर्थसंकल्पामध्ये पहायला मिळाले.केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या आर्थिक धोरणाचे प्रतीक असतो. माहिती तंत्रज्ञान अर्थात आयटी क्षेत्र हे भारताच्या जीडीपीमध्ये मोठे योगदान देणारे क्षेत्र असल्याने आयटीशी संबंधितांच्या अर्थमंत्र्यांकडून नेहमीच मोठ्या अपेक्षा असतात. भारताची अर्थव्यवस्था वेगाने बदलत असताना माहिती तंत्रज्ञान म्हणजेच आयटी क्षेत्र त्या बदलाचे प्रमुख इंजिन ठरले आहे. १९९०च्या दशकात सुरू झालेला संगणकीकरणाचा प्रवास आज कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डेटा नॅलिटिक्स आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपर्यंत पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर २०२६-२७ साठी सादर करण्यात आलेले केंद्रीय अंदाजपत्रक आयटी क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. हे अंदाजपत्रक केवळ आर्थिक आकड्यांपुरते मर्यादित न राहता भारताच्या डिजिटल भवितव्याची दिशा ठरवणारे आहे, असे म्हणणे वावगे ठरू नये. २०२६ च्या अंदाजपत्रकाचा मूलभूत उद्देश 'विकसित भारत' या संकल्पनेभोवती फिरतो. आर्थिक वाढ, रोजगारनिर्मिती, गुंतवणूक वाढवणे आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रशासन अधिक कार्यक्षम करणे हे या अंदाजपत्रकाचे प्रमुख स्तंभ आहेत. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आयटी क्षेत्र या सर्व उद्दिष्टांचा केंद्रबिंदू असल्याने धोरणात्मक पातळीवर महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या अंदाजपत्रकातील एक महत्त्वाचा बदल म्हणजे आयटी आणि आयटी-संबंधित सेवांचे एकत्रीकरण. सॉफ्टवेअर सेवा, आयटी-एनेबल्ड सर्व्हिसेस, ज्ञानाधारित प्रक्रिया सेवा आणि कराराधारित संशोधन या सर्व सेवा एका एकसमान 'माहिती तंत्रज्ञान सेवा' या वर्गाखाली आणण्यात आल्या आहेत. यामुळे कर नियमांमध्ये स्पष्टता येते, कंपन्यांवरील अनुपालनाचा ताण कमी होतो आणि उद्योगासाठी एक स्थिर, पूर्वानुमान करता येणारे वातावरण निर्माण होते. विशेषतः लहान आणि मध्यम आयटी कंपन्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.ताज्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. डेटा सेंटर्स, क्लाउड सेवा आणि उच्च क्षमतेचे नेटवर्क हा आधुनिक डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परदेशी क्लाउड कंपन्यांना भारतातील डेटा सेंटर्स वापरून जागतिक ग्राहकांना सेवा देण्यासाठी २०४७ पर्यंत 'टॅक्स हॉलिडे' जाहीर करण्यात आला आहे; भारतीय ग्राहकांसाठी स्थानिक रिसेलरद्वारे सेवा द्यावी लागेल. संबंधित डेटा सेंटर प्रदात्यांसाठी १५ टक्के खर्चावर सेफ हार्बर मार्जिन उपलब्ध आहे. भारताला जागतिक डेटा हब बनवण्याच्या दृष्टीने डेटा सेंटर्ससाठी करसवलती, दीर्घकालीन धोरणात्मक पाठबळ आणि गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात दिसून येतो. यामुळे परदेशी तसेच देशांतर्गत गुंतवणूक वाढून आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान हा अंदाजपत्रकाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. एआय, मशीन लर्निंग, रोबोटिक्स आणि सायबर सुरक्षेसारख्या क्षेत्रांमध्ये संशोधन, नवोन्मेष आणि कौशल्य विकासासाठी सरकारी पाठबळ देण्याचे संकेत मिळतात. आयटी क्षेत्र आता केवळ सेवा पुरवठादार न राहता नवकल्पनांचा स्रोत बनत आहे. स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे भारत जागतिक स्तरावर तंत्रज्ञानातील नेतृत्व भूमिका बजावू शकतो. मानव संसाधन विकास हा आयटी क्षेत्राचा कणा आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल कौशल्य विकासावर दिलेला भर विशेष उल्लेखनीय आहे.आयटी क्षेत्राचा प्रभाव केवळ आर्थिक मर्यादेत न राहता प्रशासन, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक समावेशनापर्यंत विस्तारला आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, ई-गव्हर्नन्स, ऑनलाइन शिक्षण आणि टेलिमेडिसिन यासारख्या उपक्रमांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ होत आहे. अंदाजपत्रक २०२६ या डिजिटल परिवर्तनाला गती देण्याचा प्रयत्न करते. यामुळे पारदर्शकता, कार्यक्षमता आणि समावेशक विकास साध्य होऊ शकतो. तथापि, या संधींसोबतच काही आव्हानेही आहेत. जागतिक आर्थिक अनिश्चितता, तंत्रज्ञानात झपाट्याने होणारे बदल आणि कौशल्यातील तफावत यांचा सामना आयटी क्षेत्राला करावा लागणार आहे. अंदाजपत्रकाने दिशा दिली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी, धोरणांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी आणि उद्योग-शिक्षण-संशोधन यांच्यातील समन्वय अत्यावश्यक आहे. एकूणच, यंदाचा अर्थसंकल्प आयटी क्षेत्रासाठी सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना तसेच कौशल्य विकासावर लक्ष यामुळे आयटी क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनात आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल. योग्य अंमलबजावणी आणि सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ मिळाल्यास आयटी क्षेत्र भारताला 'विकसित राष्ट्र' बनवण्याच्या प्रवासात निर्णायक योगदान देईल, अशी आशा बाळगता येते.

# सातपुड्यात रंगणार पारंपारिक हेलिकोत्सव

## डाब येथील देवीची होळी, परिसरात गुंजतोय ढोल आणि पारंपारिक होळी गीतांचा आवाज, आदिवासी बांधवांमध्ये उत्साह संचारला

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

सातपुड्याच्या पर्वत रांगेत अतिशय श्रद्धेने परंपरागत पद्धतीने साजरा होणाऱ्या होलिकत्सवाला दि. २६ फेब्रुवारीपासून मोठ्या उत्साहात प्रारंभ होत आहे. होलीकोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सातपुड्यात रात्री वाजणाऱ्या ढोलचे गुंजन व निनाद तसेच मंजुळ आवाजात गायले जाणारे होळी गीते ही उत्सवाचे आकर्षण ठरले आहे.



सातपुड्यातील होलीकोत्सवाला यंदा २६ फेब्रुवारीपासून मोठ्या उत्साहात प्रारंभ होत आहे त्यामुळे सातपुड्यातील दऱ्या खोऱ्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. दिनांक २६ फेब्रुवारी रोजी डाब येथील मोरीराही ही देवाची होळी साजरी होईल व त्यानंतर काठी येथील राजवाडी होळी व धडगाव तालुक्यातील बिजरी येथील होळी या सातपुड्याच्या कुशीतील विशेष आकर्षण असणाऱ्या होळी साजऱ्या होतील. सातपुड्याच्या कुशीत एकाच दिवशी होळी पेटविली जात नाही. प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या दिवशी होळी पेटवण्याची परंपरा आहे. दि. २६ फेब्रुवारी रोजी डाब येथील देवाची होळी म्हणून प्रसिद्ध असलेली होळी साजरी झाल्यानंतर सातपुड्याच्या होलिकोत्सवाला प्रारंभ होईल. दि. २७ फेब्रुवारी रोजी तालुक्यातील तोडीकुंड ,काकरपाटी,दाब, असली,पानबारी,तोडीकुंड, बालाघाट,मोख,मानवाणी, काकडपाटी येथील होळी पेटणार आहे तर २८ फेब्रुवारी रोजी डाबचा पाटील पाडा ,वालंबा, मेवडी,ओरपा,व धडगाव तालुक्यातील गौऱ्या खुंटामोळी ,पाडली व मॉडेल गाव येथे होळी साजरी होईल. त्यानंतर १ मार्च रोजी धडगाव तालुक्यातील कालीबेल ,ओहवा, अक्कलकुवा तालुक्यात उर्मिलामाळ,वेली,अंस्तबा, उमरागव्हाण,सरी,येथे तर २ मार्च रोजी संपूर्ण देशात प्रसिद्ध असलेली सातपुड्यातील काठी येथील राजवाडी होळी साजरी करण्यात येणार आहे. काठी येथील राजवाडी होळी पाहण्यासाठी केवळ सातपुड्यातीलच नव्हे तर देश विदेशातील पर्यटक या होळीला पाहण्यासाठी येत असतात त्यामुळे या होलिकोत्सवाची जोरदार तयारी सुरु करण्यात आली आहे. दिनांक २ मार्च अक्कलकुवा तालुक्यात गदवाणी,भगदरी,चिंचखेडी रोजी धडगाव तालुक्यातील सुरवाणी व मांडवी,पडामुंड, येथे ही होळी साजरी केली जाईल तर ३ मार्च रोजी अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी, सल्लीबार,धडगाव तालुक्यात तलाई,खर्डी येथे दि. ४ मार्च रोजी जामली,मोगरा, राजबर्डी तर ५ मार्च रोजी वरखेडी,धनाजे ,जमाना ६ मार्च भुगवाडा येथील होळी साजरी होणार आहे सातपुड्याचा परंपरागत उत्सव म्हणून होळी पर्वाकडे पाहिले जाते त्यामुळे रोजगार व नोकरीच्या निमित्ताने बाहेरगावी गेलेले सातपुडावासी आप आपल्या गावी परतले आहेत.

# हवाई वाहतुक मंत्री राममोहन नायडूंना पदावर राहण्याचा अधिकार नाही-रोहित पवार

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे नेते अजित दादा यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या चौकशी आणि न्यायाच्या मागणीसाठी जनतेतून आवाज उठत आहे. या पार्श्वभूमीवर, आमदार रोहित पवार यांनी केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री राममोहन नायडू यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. डीजीसीए ने (नागरी उड्डाण प्राधिकरण) व्हीएसआर व्हेंचर्सला दिलेले सुरुवातीचे क्लीन चिट आणि त्यानंतरच्या विशेष सुरक्षा ऑडिटमधील निष्कर्षांमध्ये मोठी विसंगती असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे.विधानभवनात माध्यमांशी बोलताना रोहित पवार यांनी सांगितले की, २८ जानेवारी २०२६ रोजी, अपघातानंतर लगेचच डीजीसीएने एक अहवाल जारी केला होता. या अहवालात व्हीएसआर व्हेंचर्सच्या लियरजेट विमानामध्ये कोणतीही लेव्हल एक त्रुटी आढळली नसल्याचे नमूद करण्यात आले होते. त्याच दिवशी केंद्रीय हवाई वाहतूक मंत्र्यांनीही व्हीएसआर व्हेंचर्समध्ये सुरक्षाविषयक कोणतीही चिंता नसल्याचे म्हटले होते.मात्र, अलीकडेच झालेल्या व्हीएसआर व्हेंचर्सच्या विशेष सुरक्षा ऑडिटमध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत. यामध्ये विमान उडण्यायोग्य आहे की नाही, हवाई सुरक्षा आणि उड्डाण कार्यान्वित करण्याच्या प्रक्रियेतील त्रुटींचा समावेश आहे. जनतेच्या दबावामुळेच हा तपास योग्य दिशेने जात असल्याचे रोहित पवार यांनी नमूद केले. या गंभीर विसंगतीमुळे, त्यांनी केंद्रीय मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे, जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत हा लढा सुरूच राहील असे त्यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले. दरम्यान आज आमदार रोहित पवार आमदार रोहित पवार मुंबईतील मरीन लाईन्स पोलिस स्थानकात दाखल झाले. डीजीसीए आणि व्हीएसआर या विमान कंपनीविरोधात तक्रार दाखल करण्यासाठी ते पोलिस स्थानकात गेले. रोहित पवारांनी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणाच्या संदर्भात ते आक्रमक भूमिका घेताना दिसले. पोलिसांशी संवाद साधताना रोहित पवारांनी केवळ अर्ज स्वीकारण्याऐवजी थेट एफआयआर नोंदवण्याची मागणी केली. हे केवळ एक निवेदन नाही तर एक तक्रार आहे, ज्यावर त्वरित एफआयआर दाखल व्हायला हवा. आम्हाला प्लिकेशन द्यायची नाही, डायरेक्ट एफआयआर घ्या, असे रोहित पवार यांनी म्हटले. ही घटना अजित पवार केस या शीर्षकात नमूद केलेल्या मोठ्या प्रकरणाचा एक भाग मानली जात आहे, ज्यामुळे राजकीय वर्तुळात या घडामोडींना महत्त्व प्राप्त झाले आहे.



# ठाणे-बोरीवली भुयारी मार्ग-मातीच्या विल्हेवाटीसाठी डेडीकेडेट कॉरिडॉरचा आग्रह

## न जुमानणाऱ्या विकासकांवर कारवाईची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

ठाणे ते बोरिवली भुयारी मार्गाच्या खोदाईदरम्यान निघणाऱ्या मातीच्या वाहतूकीवरून स्थानिक रहिवाशी आणि विकासकांमध्ये जुंपण्याची चिन्हे आहेत.मातीची विल्हेवाट लावण्यासाठी एमएमआरडीएने कन्व्हेयर बेल्टचा प्रस्ताव दिला मात्र ९० टक्के रहिवाश्यांची डेडीकेटेड कॉरीडॉरला (विशेष वाहतुक मार्गिका) सहमती आहे. या प्रकल्पाच्या मध्ये जी जागा आहे तेथुन मातीचे डंपर पास होणार असल्याने वाहतुकीचाही प्रश्न उदभणार नाही. असा दावा मंगळवारी पत्रकार परिषद घेऊन रहिवाश्यांनी केला. तसेच, महापालिकेने नोटीस बजावूनही काही विकासक जुमानत नसल्याने त्यांच्या विरोधात प्रशासनाने कारवाई करावी, अन्यथा रस्त्यावर उतरण्याचा इशाराही या रहिवाश्यांनी दिला आहे.



मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा मार्फत ठाणे ते बोरिवली या महत्वाकांक्षी भुयारी मार्ग प्रकल्पाची उभारणी ठाण्यातील मुल्ला बाग परिसरात सुरू आहे. सुमारे १८,८३८ कोटी रुपये खर्चून हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. या भुयारी मार्ग खोदाई दरम्यान निघणाऱ्या मातीच्या वाहतुकीवरून सध्या स्थानिक रहिवाशी आणि तेथील विकासकामध्ये जुंपली आहे. दररोज ३५० डम्पर माती वाहतूक करणार असल्याने परिसरात हवा प्रदुषणात वाढ होण्याची भीती व्यक्त करत त्यास रहिवाशांनी विरोध दर्शविला आहे. हवा गुणवत्ता निर्देशांक २५० पर्यंत जातो. त्यामुळे प्रदुषणाचा त्रास वाढत असुन अनेकांना आजार बळावत आहत. व्हेराटॉन, निलकंठ ग्रीन्स, सत्य शंकर हे विकासकांना कन्व्हेयर बेल्ट हवा आहे. मात्र, डेडीकेडेट कॉरिडॉरला ९० टक्के रहिवाश्यांची सहमती आहे. सर्वप्रथम भुयारी मार्गाची टेल कंप्लीट करून टाकावी, तसेच, डेडीकेटेड कॉरिडॉरमधील जी जागा आहे तेथुन मातीचे डंपर पास होणार असल्याने वाहतुकीचा प्रश्नही उद्भवणार नसल्याचे रहिवाश्यांचे म्हणणे आहे. याला ९० टक्के रहिवाश्यांची सहमती आहे. या संदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार नरेश म्हस्के हे लवकरच यासंदर्भात बैठक घेणार असल्याचेही रहिवाश्यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. यावेळी, शिवसेना नगरसेवक सिद्धार्थ पांडे, राकेश मोदी, आशुतोष शिरोळकर, निवृत्त अभियंता भिडे, धाने, मुजुमदार आणि शरद वास्कर आदी रहिवाशी उपस्थित होते.

# महाराष्ट्र टाइम्सच्या उपक्रमातून मराठी भाषा-संस्कृतीचा उत्सव उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांचे तरुणांना प्रेरणादायी मार्गदर्शन

## मराठी भाषा-संस्कृतीच्या जतनासाठी तरुणांचा सहभाग महत्त्वाचा-डॉ.गोऱ्हे

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मराठी दिनानिमित्त 'महाराष्ट्र टाइम्स'द्वारे आयोजित करण्यात आलेल्या माय मराठी कलासंगम - उत्सव मराठीचा या कार्यक्रमात तरुण पिढीचा उत्स्फूर्त सहभाग पाहून विशेष आनंद झाल्याचे विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले. दरवर्षीप्रमाणे यंदाही दैनिक महाराष्ट्र टाइम्स तर्फे भाषा, कला, साहित्य आणि संस्कृतीचा संगम घडवून आणणारा शोध युवा प्रतिभेचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला मंत्री प्रतापराव सरनाईक, निवासी संपादक समीर कर्वे,मराठी बाणा फेम अशोक हांडे,कथा लेखिका शिल्पा कांबळे, अभिनेते पुष्कर श्रोत्री, उद्योजक विठ्ठल कामत, रघुवीर खेडकर, प्रा. आदित्य दवणे यांच्यासह परीक्षक व सहभागी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन मुख्य संपादक पराग करंदीकर यांनी व सहकाऱ्यांनी केले.आपल्या भाषणात डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, सांस्कृतिक कार्यक्रमांचे सरासरी वय पाहिले तर ते साधारणपणे पन्नाशीच्या पुढे दिसते; परंतु तरुण पिढीने जर भाषेशी नाळ जोडली नाही तर भाषा हळूहळू दुर्मिळ होण्याचा धोका असतो. मराठीला अभिजात दर्जा मिळणे ही अभिमानाची बाब असून तमाशापासून लोकसाहित्यापर्यंत, आरत्या ते ग्रंथपरंपरा आणि खाद्यसंस्कृतीपासून गीतपरंपरेपर्यंत सर्व घटकांचा त्यात समावेश होतो, असे त्यांनी नमूद केले. भाषा, भूषा, भोजन आणि भवन या चार घटकांतून संस्कृती पुढे जाते, हा विचार त्यांनी अधोरेखित केला.महाविद्यालयीन काळात लेखन, निवडणुका आणि उपक्रमांमध्ये सहभाग घेतल्याच्या आठवणी सांगत त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. पुरस्कार मिळालेल्यांचे अभिनंदन करताना त्यांनी पुरस्कार न मिळालेल्यांचेही विशेष कौतुक केले आणि पुन्हा प्रयत्न करण्याची प्रेरणा दिली. महाराष्ट्र टाइम्समध्ये आपली स्वतःबाबत किंवा कार्याबाबत बातमी प्रसिद्ध झाली की दिवस संस्मरणीय ठरतो, असेही त्यांनी मनोगत व्यक्त केले.भाषणाच्या शेवटी त्यांनी ज्येष्ठ कवी विं दा करंदीकर यांच्या चुकली दिशा तरीही या कवितेचा उल्लेख करत तरुणांना संदेश दिला की दिशा चुकली तरी प्रयत्न सोडू नयेत; आवश्यक असल्यास दिशा बदलता येते आणि ध्येयासाठी झटल्यास यश निश्चित मिळते.



# सर्व विभागांनी समन्वय ठेवून उद्दिष्टपूर्ती करावी-डॉ.निधी पांडे

## कृषी संलग्न विभागांचा सविस्तर आढावा; कृषी विभागाच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यात कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या योजनांचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ मिळावा व दिलेली उद्दिष्टे विहित वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून कार्य करावे, अशा सूचना प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेच्या केंद्रीय नोडल अधिकारी तथा भारत सरकार राजभाषा विभागाच्या संयुक्त सचिव डॉ. निधी पांडे यांनी दिल्या.



आज जिल्हाधिकारी कार्यालयात कृषी विभागाशी संलग्न विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. देशमुख, कृषी उपसंचालक श्री. वानखेडे, प्रकल्प उपसंचालक आत्मा अनिल शिरफुले, जलसंधारण अधिकारी कांबळे, रेशीम विभागाच्या तंत्र अधिकारी कांचन जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

डॉ. पांडे म्हणाल्या की, जिल्ह्यासाठी कृषी विभागाने तयार केलेल्या जिल्हा आराखड्यात आवश्यक त्या सुधारणा करून उद्दिष्टपूर्ती वेळेत करावी. तसेच यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीबाबत त्यांचा अभिप्राय व अडचणी जाणून घ्याव्यात. शेतकऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवून व्हॉट्सअॅप गटांच्या माध्यमातून समन्वय साधावा व त्यांच्या समस्या तात्काळ सोडवाव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या. जिल्ह्यातील कृषी विभागाच्या कामकाजाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी कृषी विभागामार्फत जिल्ह्यात एआयचा वापर, चिया व मका लागवडीस प्रोत्साहन, १ लाख जलतारा उद्दिष्ट, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मोफत बियाणे वाटप, फार्मर कपतर्फे ५५० शेतकऱ्यांना तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण, महाडीबीटी अंतर्गत लाभ वितरण, यांत्रिकीकरण, तसेच रब्बी हंगामातील पेरणी आदी बाबींचे सादरीकरण करण्यात आले.

तसेच पशुसंवर्धन विभागाच्या योजना, महारेशीम अभियानाची उद्दिष्टपूर्ती, रेशीम शेतीचे फायदे, मत्स्यव्यवसाय विभागाची शेततळे व मत्स्यपालनातील कामगिरी, पशुसंवर्धनातील लसीकरण व दूध उत्पादनवाढीच्या उपाययोजना यांची माहिती देण्यात आली. यासोबत जिल्हा उपनिबंधक, ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा उद्योग केंद्र, फार्मर कप, सिंचन, जिल्हा जलसंधारण विभाग, नाबार्ड, कापूस संशोधन केंद्र, अग्रणी बँक आदी विभागांचाही सविस्तर आढावा घेण्यात आला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील सर्व विभागांचे काम सुव्यवस्थित सुरू असून पशुसंवर्धन विभागाचे कार्य विशेष प्रगतीपथावर असल्याचे नमूद केले. तसेच मत्स्यपालन क्षेत्रातही जनजागृती वाढताना दिसत असल्याचे सांगितले. सर्व योजनांचा लाभ तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विभागांचे सहकार्य आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना अंतर्गत आज सकाळी नांदेड तालुक्यातील धनगरवाडी येथील रेशीम शेती व विविध केंद्र पुरस्कृत योजना याबाबत संयुक्त सचिव डॉ. निधी पांडे यांनी पाहणी दौरा केला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत व तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल व संपूर्ण चमू व रेशीम उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# महाराष्ट्र पत्रकार संघाच्या पुणे जिल्हा अध्यक्षपदी विजय जगताप यांची निवड

दैनिक वादळ वार्ता
**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पत्रकार संघाच्या पुणे जिल्हाध्यक्षपदी विजय मानसिंग जगताप यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विजय जगताप म्हणजे जिद्द, ध्येयनिष्ठा, अनुभवसामर्थ्य, शिक्षणाभिमुख वृत्ती आणि सकारात्मक दृष्टिकोन. पत्रकारिता क्षेत्रातील भरीव योगदानाची दखल घेत महाराष्ट्र पत्रकार संघाचे राज्याध्यक्ष आदरणीय विलासरावजी कोळेकर यांनी ही निवड केली आहे.विजय जगताप यांनी बी.ए.बी.एड., डी.एस.एम., एम.बी.ए.(एच आर) असे उच्च शिक्षण घेतलेले असून गेली पंधरा वर्षांहून अधिक काळ ते शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असून, त्याचबरोबर पत्रकारिता क्षेत्रातही त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. अनेक विद्यार्थ्यांना योग्य करिअरची दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे. याबरोबरच पत्रकारितेच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचे काम ते सातत्याने करत आहेत. याशिवाय सर्वसामान्य नागरिकांपर्यंत शासनाच्या विविध योजना पोहोचवणे, युवकांना व्यवसाय व रोजगार मार्गदर्शन करणे या सामाजिक बांधिलकीच्या कार्यात ते नेहमीच सक्रिय असतात. तसेच त्यांनी विविध सामाजिक, प्रशासकीय याशिवाय नागरिकांच्या हिताविषयी नेहमीच विविध



वृत्तपत्रांमधून लेखन केले आहे. पुणे जिल्हा हा शैक्षणिक, सामाजिक व विकासात्मक दृष्ट्या अत्यंत संपन्न जिल्हा असून, या जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र पत्रकार संघ अधिक सक्षम करणे, पत्रकारांच्या समस्या मांडणे व पत्रकारितेची गुणवत्ता वाढवणे, ही जबाबदारी विजय जगताप यांच्यावर सोपवण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल पुणे जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय तसेच औद्योगिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या असून पुणे जिल्ह्यात महाराष्ट्र पत्रकार संघ अधिक गतिमान होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे

# कडक ऊन, बोचरी थंडी आणि अवकाळी पाऊस:निसर्गाचा बदलता स्वभाव नागरिकांना त्रस्त

दैनिक वादळ वार्ता
**कंधार । प्रतिनिधी**

दिवसभर कडक ऊन, रात्री बोचरी थंडी आणि अधूनमधून अवकाळी पावसाच्या सरी – या तिहेरी बदलत्या वातावरणामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. हवामानातील या अनिश्चिततेमुळे निसर्गाचे नियम बदलत आहेत काय? असा प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात निर्माण झाला आहे.मागील काही दिवसांपासून सकाळी ऊन तापू लागते, दुपारी उकाड्याची झळ जाणवते; मात्र सूर्य मावळताच थंडीची लाट अंगावर येते. त्यातच अचानक पडणाऱ्या अवकाळी पावसामुळे वातावरणात गारवा आणि दमटपणा वाढतो. या सततच्या बदलामुळे लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्दी, खोकला, ताप, घसा दुखणे आणि अंगदुखी यांचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. स्थानिक दवाखान्यांत रुग्णांची



संख्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारचे अचानक होणारे हवामानातील चढउतार शरीराच्या प्रतिकारशक्तीवर परिणाम करतात. विशेषतः लहान मुले, वृद्ध नागरिक आणि आधीपासून आजार असलेले रुग्ण यांना याचा अधिक त्रास जाणवतो. दिवसा उष्णतेमुळे हलके कपडे वापरले जातात; मात्र रात्री अचानक थंडी वाढल्याने सर्दी–खोकल्याचे प्रमाण झपाट्याने वाढते.शेतकरी वर्गालाही या बदलत्या हवामानाचा फटका बसत आहे. अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. एकीकडे उन्हामुळे पिके कोमेजण्याचा धोका, तर दुसरीकडे अचानक पावसामुळे रोगराई वाढण्याची शक्यता – अशा दुहेरी संकटाला शेतकरी सामोरे जात आहेत.पर्यावरण तज्ज्ञांचे मत आहे की, जागतिक तापमानवाढ, जंगलतोड आणि वाढते प्रदूषण यामुळे हवामानाचे चक्र विस्कळीत होत आहे. ऋतूंची ठरलेली वेळ आणि स्वरूप बदलत चालल्याची जाणीव सर्वांना होत आहे. यावर दीर्घकालीन उपाय म्हणून पर्यावरण संवर्धन, वृक्षलागवड आणि प्रदूषण नियंत्रण यावर भर देणे अत्यावश्यक आहे.दरम्यान, नागरिकांनीही स्वतःची आणि कुटुंबियांची काळजी घेणे गरजेचे आहे. हवामानानुसार योग्य कपडे परिधान करणे, गरम पाणी पिणे, पौष्टिक आहार घेणे आणि आवश्यक असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. बदलत्या वातावरणात सजग राहणे हीच काळाची गरज बनली आहे.एकूणच, कडक ऊन, बोचरी थंडी आणि अवकाळी पावसाच्या या त्रासदायक संगमामुळे नागरिक हैराण झाले असून, निसर्गाचा हा बदलता स्वभाव चिंता वाढवणारा ठरत आहे. आता तरी पर्यावरणाबाबत जागरूक होऊन निसर्गाशी सुसंवाद साधण्याची वेळ आली आहे, अशी भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

# रोजगार सहाय्यकांच्या पाठीशी सरकार ठामपणे उभे-आ.अभिमान्यू पवार

## ग्रामरोजगार सेवकांशी संवाद साधताना आमदार पवार

## ग्रामरोजगार सेवकांच्या प्रश्नांवर आवाज उठवणार!

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

ग्राम पंचायत स्तरावरील रोजगार हमी योजनेचा कणा असणारे रोजगार सहाय्यक असून त्यांच्या विविध प्रलंबितमागण्यांसाठी मुंबई येथील आझाद मैदानात सुरु असलेल्या ग्राम रोजगार सेवकांच्या आंदोलनाला शेतरस्तांचे जनक आमदार अभिमान्यू पवार यांनी भेट देत आंदोलनकर्त्यांशी संवाद साधला. रोजगार सहाय्यक यांच्या समस्या समजून घेत त्यांच्या मागण्यांबाबत शासन स्तरावर सकारात्मक पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.आमदार पवार यांनी रोजगार सहाय्यक यांच्या प्रलंबित मानधन प्रश्न, तसेच




नियमित वेतन चुकीच्या पध्दतीने रोजगार सेवकांस काढण्यांची पध्दत बंद करावी,या प्रमुख मागण्यांची माहिती जाणून घेतली. ग्रामपंचायत स्तरावर नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात रोजगार सेवकांचे महत्वाचे योगदान महत्त्वपूर्ण असून त्यांच्या प्रश्नांवर संवेदनशीलतेने निर्णय होणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कार्यरत ग्राम रोजगार सेवकांच्या आंदोलनालाही त्यांनी भेट दिली. ग्राम रोजगार सेवकांनी मानधन वाढ, प्रवास भत्ता, सेवेला स्थैर्य तसेच शासन निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी या प्रमुख मागण्या मांडल्या. या मागण्यांसंदर्भात चालू असलेल्या अधिवेशनात विधानसभेत आवाज उठवून न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.याप्रसंगी रोजगार सेवक संघटनेचे प्रमुख पदाधिकारी अमोल वाकोडे,बाळासाहेबतायाडे,विनोद चव्हाण, राजेंद्र जिचकर,श्रावण बोकडे,सह अनेक जेष्ठ पदाधिकारी व औसा तालुक्यातील बालाजी रेड्डी, अंकुश जाधव,गोरख कांबळे, विठ्ठल पांचाळ, महेश कोळी, शिवराज कांबळे, चंद्रकांत जगताप , ज्ञानोबा काळे, नेताजी निकम,धनराज रणदिवे गजानन माळी, यांच्या सह राज्यातील असंख्य रोजगार सेवक उपस्थित होते

# गडचांदुरात गुटखा विक्रीला ऊत; कॅन्सरला आमंत्रण?

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्यात सुगंधीत तंबाखू व गुटखा विक्रीवर बंदी असतानाही गडचांदुर शहरात उघडपणे गुटखा, तंबाखू व सिगारेटची विक्री सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. गल्लीबोळातील टपऱ्यांवर राजरोषपणे सुगंधीत तंबाखूची विक्री होत असून, यामुळे कॅन्सरसारख्या जीवघेण्या आजाराचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



महाराष्ट्र शासन यांनी कॅन्सरवर आळा घालण्यासाठी सुगंधीत तंबाखू व गुटखा विक्रीवर कायदेशीर बंदी लागू केली आहे. मात्र गडचांदुरमध्ये या बंदीची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी स्थानिक पोलीस प्रशासनावर असताना, संबंधित ठाणेदारांकडून दुर्लक्ष होत असल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे.

काही सजग नागरिकांच्या मते, अवैध धंद्यांना मूकसंमती दिली जात असल्यानेच हा व्यवसाय खुलेआम फोफावत आहे. परिणामी तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकत असून सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे.

दरम्यान, या प्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून कारवाई करावी, अशी मागणी शहरातील सामाजिक संघटना व नागरिकांकडून करण्यात येत आहे. गुटखा व सुगंधीत तंबाखूच्या अवैध विक्रीवर आळा बसतो का, आणि प्रशासन ठोस पावले उचलते का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बारावी जीवशास्त्राची परीक्षा जिल्ह्यातील १०९ परीक्षा केंद्रावर सुरळीत:जिल्हाधिकारी राहूल कर्डिले

दैनिक वादळ वार्ता
**कंधार । प्रतिनिधी**

जिल्ह्यात इयत्ता बारावीच्या जीवशास्त्र विषयाची परीक्षा जिल्ह्यातील १०९ केंद्रांवर आज सुरळीतपणे पार पडली. एकूण २१ हजार ९३७ परीक्षार्थ्यांपैकी २१ २हजार ५५० विद्यार्थी उपस्थित राहिले असून उपस्थितीचे प्रमाण ९८.२४ टक्के नोंदविण्यात आले. प्रत्येक परीक्षा केंद्रावर बैठे पथकांमार्फत झूम वेबकास्टद्वारे तसेच ड्रोन आणि व्हिडिओ कॅमेराच्या सहाय्याने संपूर्ण वेळ परीक्षेवर नियंत्रण ठेवण्यात आले. त्यामुळे सर्व १०९ केंद्रांवर परीक्षा शांततापूर्ण व कॉपीमुक्त वातावरणात पार पडल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.

कंधार तालुक्यात पानभोसी येथील नेताजी सुभाषचंद्र बोस उच्च माध्यमिक विद्यालय या केंद्रास भेट देऊन परीक्षा व्यवस्थेची पाहणी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केली. ते या केंद्रावर पेपर संपेपर्यंत उपस्थित होते. त्यांच्यासमवेत उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी हे देखील उपस्थित होते.

नायगाव तालुक्यात नरसी येथील राणी लक्ष्मीबाई कमवि येथे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड यांनी भेट दिली असता एक परीक्षार्थी गैरप्रकार करताना आढळून आला. संबंधित विद्यार्थ्यावर मंडळाच्या नियमानुसार कारवाई करण्यात आली. नायब तहसीलदार श्रीमती अरुणा सूर्यवंशी यांनी माहूर येथील जगदंबा उच्च माध्यमिक विद्यालय येथे भेट दिली असता एका विद्यार्थ्यावर गैरप्रकार प्रकरणी कारवाई करण्यात आली.



तसेच किनवट येथील दहेलीतांडा या परीक्षा केंद्राच्या बाहेर काही अज्ञात व्यक्ती आढळून आल्याने त्या ठिकाणी संबंधित व्यक्तींविरोधात सिंदखेड पोलीस स्टेशन येथे गुन्ह्याची नोंद करण्याची कार्यवाही सुरु आहे, अशी माहिती दहेलीतांडा परीक्षा केंद्राचे संचालक यांनी दिली.

आज २५फेब्रुवारी रोजी जीवशास्त्राच्या पेपरसाठी जिल्हास्तरावरील सुमारे ६२ अधिकारी हे ६२ केंद्रांवर पूर्णवेळ उपस्थित होते. शिक्षण विभागाचे ७अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व गटविकास अधिकारी अशा एकूण ४० व इतर अधिकाऱ्यांनी भरारी पथकांमार्फत १०९ केंद्रांवर देखरेख ठेवली.

दहावी-बारावीच्या सर्व परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात होत असून विद्यार्थी व पालकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. उर्वरित परीक्षा देखील अशाच पारदर्शक, शिस्तबद्ध वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

# पुढल्या पिढ्यांच्या अस्तित्वासाठी वृक्ष लावू चला

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**




आज शहरांचा विकास सध्या झपाट्याने होताना दिसतोय.मेट्रो मोनो आणि वाहतुकीसाठी अत्याधुनिक पुलांचे बांधकाम वेगाने सुरू असलेले दिसतेय.त्याचवेळी मोठमोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या इमारती आणि व्यावसायिक बांधकाम देखील जोरात सुरू आहे.मात्र विकासाच्या या सगळ्या गदारोळात मोठ्या प्रमाणात प्रदूषण वाढतेय, आणि वृक्षतोड देखील तितक्याच झपाट्याने होताना दिसतेय.परंतु पर्यावरण संवर्धनाचा केवळ आव आणून वृक्ष वेली हा केवळ सजावटीचा भाग बनलेला असून प्रत्यक्षात मात्र वृक्षसंवर्धन न केल्यामुळे पर्यावरणाचा वेगाने ऱ्हास होतोय आणि अगदी हे दुष्टचक्र असेच सुरू राहिले तर पुढील काही दशकांत पृथ्वीवरील मानवी अस्तित्वच नष्ट होण्याची भीती पर्यावरण रक्षक संस्थाकडून व्यक्त केली जात आहे.याच पार्श्वभूमीवर हवामान बदलाशी लढन्यासाठी ,सार्वजनिक आरोग्य राखण्यासाठी आणि वृक्ष संवर्धन करून शाश्वत विकास सुनिश्चित करण्यासाठी मुंबईत येत्या ७ आणि ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय वृक्ष संवर्धन परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.अमेनीटी ट्री केअर असोशिएशन आणि नानाजी देशमुख प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे.जलद शहरीकरणामुळे वृक्ष संरक्षण आणि संवर्धन याकडे दुर्लक्ष होत असून राज्य सरकार ,महानगर.पालिका आणि स्थानिक संस्थांनी वृक्ष संवर्धन मानके,तांत्रिक शिक्षण आणि शहरी वृक्ष कायद्याच्या दिशेने मजबूत धोरण राबविण्याची गरज असल्याचे मत या परिषदे संदर्भात माहिती देताना अमेनिती चे संचालक वैभव राजे यांनी व्यक्त केले.यंदाच्या दुसऱ्या वर्षाच्या या आंतरराष्ट्रीय वृक्ष परिषदेची संकल्पना ही वाढती शहर आणि हिरवागार परिसर अशी असणार आहे.मुंबई सारख्या गतीशील शहरात विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन साधत येऊ शकते याशिवाय वृक्षांना शहरी विकासातील अडथळे न मानता हवामान सहयोगी,आरोग्य रक्षक असल्याचा नवा दृष्टिकोन जनमानसमोर आणण्याचा उद्देश असल्याचे नानाजी देशमुख प्रतिष्ठान चे मुख्य कार्यकारी अधिकारी आर्यन पांडे यांनी म्हटले.दोन दिवस संपन्न होत असलेल्या या आंतरराष्ट्रीय वृक्ष संवर्धन परिषदेत ऑस्ट्रेलियाचे बोर्ड ऑफ आर्बोरिकल्चार चे संचालक कार्ल रीवा , ट्री फाऊंडेशन यू एस ए चे सी ई ओ डॅन लांबे, गृहिल चे सहसंथापक गॅबर गोर्झ्झ, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.संग्राम चव्हाण ,बंगळुरू च्या अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या प्राध्यापक डॉ.प्राची गुप्ता इत्यादी प्रतिष्ठित तज्ञ मान्यवरांचा सहभाग असणार आहे.याच परिषदेत शहरी वृक्ष व्यवस्थापनावर प्रात्यक्षिक कार्यशाळा, तांत्रिक सत्रे, पॅनल चर्चा, पोस्टर स्पर्धा,नवीन तंत्रद्न्यान प्रदर्शन अशा विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलेलं आहे.वृक्ष प्रेमी मंडळी आणि विविध पर्यावरण प्रेमी संस्थानी मोठ्या संख्येने या परिषदेला उपस्थित रहावे अशी विनंती आयोजकांनी केली आहे.

## एन.एम.एम.एस.परीक्षेमध्ये रामराव पाटील विद्यालयाचे घवघवीत यश



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या एन. एम. एम. एस. परीक्षा मध्ये केज येथील रामराव पाटील शाळेने यशाची परंपरा कायम राखत ३३ पैकी १४ मुलांनी यश संपादन केले आहे यामध्ये जाधव पंकज बब्रुवान या विद्यार्थ्यांनी १२८ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटाकावलेला आहे, तसेच घाडगे उत्कर्ष याने १०४ गुण, महाजन आदित्य याने १००,गुण चाटे राजेंद्र यांनी ९६ गुण मिळवलेले आहेत या विद्यार्थ्यांना श्री पोटभरे श्री देवकते श्री इर्शाद श्री कळेकर श्री गोरे श्री गायकवाड,श्री नाईकनवरे यांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व अध्यापकांचे शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री खोसे व माऊली विद्यापीठाचे सचिव आदित्य पाटील,प्रशासकीय प्रताप मोरे यांनी अभिनंदन केले. सर्व यशस्वी विद्यार्थी व अध्यापकांचा यावेळी शाळेच्या वतीने गौरव करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री गोरे यांनी केले, तर सूत्रसंचालन श्रीमती गिरी यांनी केले.यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

## डोणगांव (बु) येथे विठ्ठल रुक्मिणी मुर्ती प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा उत्साहात संपन्न



दैनिक वादळ वार्ता

**नायगांव । हानुमंत चंदनकर**

नांदेडच्या बिलोली तालुक्यातील डोणगांव बु येथे आज दिनांक २६ फेब्रुवारी रोजी सकाळी १२ वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी मुर्ती प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा श्री ह भ प चंद्रशेखर महाराज देगलूरकर व डॉ विरूपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर यांच्या शुभहस्ते मुर्ती प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा संपन्न झाला याप्रसंगी गावातील बाईलेकी साधू संत महंत किर्तनकार प्रवचनकार टाळकरी माळकरी यासह हाजारो भाविकांच्या उपस्थितीत सोहळा पार पडला विरूपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर व ह भ प चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांनी अमृत उपदेश केला भव्य महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## बीड येथील अँड.राम डोंगरे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा माजलगाव वकील संघाच्या वतीने तिव्र निषेध



दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड येथील अँड राम डोंगरे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ आज माजलगाव वकील संघाच्या वतीने माजलगाव न्यायालय परिसरात तीव्र निषेध नोंदविण्यात आला.वकिलांवर होणारे वाढते हल्ले ही अत्यंत गंभीर बाब असून न्यायव्यवस्थेच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, असे मत संघाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले ,संबंधित आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.या घटनेच्या पार्श्वभूमीवर वकिलांनी दिवसभर कामकाज बंद ठेवून निषेध व्यक्त केला , तसेच जिल्हा प्रशासन आणि पोलिस विभागाने वकिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

यावेळी संघाचे अध्यक्ष, सचिव व अनेक सदस्य उपस्थित होते. या घटनेमुळे वकिलांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले असून दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा माजलगाव वकील संघाच्या वतीने देण्यात आला आहे .

# तळोदा पोलीस प्रशासनाचा पुढाकार शिस्तबद्ध पार्किंगने बाजारपेठेचा श्वास मोकळा

## पीआय राजन मोरे यांची प्रत्यक्ष मैदानात उतरून कारवाई

दैनिक वादळ वार्ता


**नंदुरबार । दिपक गोसावी**



> पोलीस आणि जनता यांच्यातील समन्वयच शहराला सुंदर बनवू शकतो. दुकानदारांनी दिलेला प्रतिसाद कौतुकास्पद आहे. यामुळे सर्वांचाच वेळ आणि श्रम वाचणार आहेत.
>
> – राजन मोरे
>
> (पोलीस निरीक्षक, तळोदा)

रमजानच्या पवित्र महिन्यात बाजारपेठेत होणारी गर्दी आणि त्यामुळे उद्भवणारी वाहतूक कोंडी यावर तळोदा पोलिसांनी अत्यंत संयमी पण प्रभावी मार्ग शोधला आहे. पोलीस निरीक्षक राजन मोरे यांनी स्वतः सहकाऱ्यांसह रस्त्यावर उतरून दुकानदारांना आणि ग्राहकांना विश्वासात घेत शिस्तबद्ध पार्किंगचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या या कृतीमुळे केवळ वाहतूक सुरळीत झाली नाही, तर दुकानदार आणि ग्राहक यांच्यातील सौहार्दही वाढण्यास मदत झाली आहे.मुख्य रस्त्यावरील पार्किंगच्या समस्येमुळे अनेकदा ग्राहकांना दुकानापर्यंत पोहोचणे कठीण होत होते. ही बाब लक्षात घेता पोलीस निरीक्षक राजन मोरे, पोलीस उपनिरीक्षक गुलाबसिंग पावरा, वाहतूक शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल संदीप महाले, होमगार्ड यशवंत कुकावलकर आणि त्यांच्या टीमने जेव्हा बेशिस्त वाहने हटवण्याच्या सूचना दिल्या, तेव्हा रस्ता मोकळा झाल्याने ग्राहकांनाही फिरणे सुखकर झाले.या मोहिमेमुळे रस्ता मोकळा राहिल्याने दुकानांची दृश्यमानता वाढली असून, गर्दीचा त्रास कमी झाल्याने ग्राहक शांतपणे खरेदी करू शकत आहेत.विनाकारण होणारे किरकोळ वाद थांबले असून प्रवासाचा वेळ वाचत आहे.गर्दीच्या वेळी रुग्णवाहिका किंवा आपत्कालीन वाहनांना रस्ता मिळणे सोपे झाले आहे. सायंकाळी ६:३० च्या सुमारास पोलीस निरीक्षक राजन मोरे यांनी स्वतः पायी चालत प्रत्येक दुकानदाराशी संवाद साधला. त्यांनी दुकानदारांना आवाहन केले की, आपण आपल्या येणाऱ्या ग्राहकांना वाहन योग्य ठिकाणी लावण्याची विनंती केल्यास रस्ता सर्वांसाठी सुरक्षित राहील. त्यांच्या या आपुलकीच्या पण ठाम भूमिकेचे व्यापाऱ्यांनीही स्वागत केले आणि स्वतःहून आपली वाहने शिस्तबद्ध रीतीने लावून प्रशासनाला सहकार्य केले.तळोदा पोलीस प्रशासनाकडून जनतेला आवाहन करण्यात येते की, खरेदीसाठी येताना आपली वाहने रस्त्याच्या मधोमध न लावता ठरवून दिलेल्या जागेतच लावावीत. आपली एक छोटीशी शिस्त शहराच्या वाहतुकीला मोठी मदत ठरू शकते.

# हार्बर लाइन रेल्वे जी.टी.बी नगर स्टेशन वरील लटकता जाहिरात फलक हटवा




दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसापासून गुरु तेग बहादूर नगर हार्बर लाइन रेल्वे स्टेशन वरील प्लॅटफॉर्म नंबर दोन वर एका जाहिरात कंपनीचा फलक लटकत्या अवस्थेत दिसत आहे. तो कोणाच्या तरी अंगावर,डोक्यावर पडण्या अगोदर त्वरित काढून टाकावा व त्या जाहिरात कंपनी विरोधात कारवाई करावी. अशी मागणी हॅपिनेस ज्येष्ठ नागरिक संघाचे प्रमुख दिलीप गाडेकर यांनी केली आहे. सदर बाब स्टेशन मास्तर कार्यालय यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. योग्य ती रेल्वे प्रशासनाने दखल घ्यावी अशी मागणी केली आहे. अन्यथा हा जाहिरात बोर्ड कोणाच्या अंगावर डोक्यावर पडल्यास त्या जाहिरात दाराकडून भरपाई करून घ्यावी अशी विनंती वजा सूचना दिलीप गाडेकर यांनी केली आहे.

## स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी प्रा.डॉ.बापूसाहेब आडसूळ यांची बिननिविरोध निवड

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**



आज राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे, राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या मार्गदर्शनाखालीच आणि संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे, भावी शिक्षक आमदार आरोग्य दूत मंगेश चिवटे यांच्या संकल्पनेतून शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी आज या सोलापूर जिल्हा कार्यक्षेत्र असणारी स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी सहकारी पतसंस्थेची स्थापना करण्यात आली या पतसंस्थेच्या चेअरमनपदी एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेचे प्रदेशाध्यक्ष, पुणे बोर्ड सदस्य, सदस्य मंत्रालय समन्वय समिती मुंबई प्रा डॉ बापूसाहेब आडसुळ यांची सर्व संचालक यांच्या मीटिंगमध्ये बिनविरोध चेअरमनपदी निवड करण्यात आली तर व्हा चेअरमनपदी प्रदेश सचिव प्रा गंगाधर पडणूरे यांची निवड करण्यात आली प्रसंगी सर्व संचालक मंडळ व शिक्षक सेनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते यावेळी चेअरमन व्हा चेअरमन यांचा सत्कार सर्व संचालक मंडळ आणि डी डी आर ऑफिसचे जुजगार साहेब यांच्या शुभहस्ते सत्कार करून शुभेच्छा दिल्या या निवडीबद्दल सोलापूर जिल्हा बरोबर राज्यामध्ये शुभेच्छांचा वर्षाव होत आहे या निवडीबद्दल राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या

## सावळेश्वर पैठण च्या शिवकन्यांचा जिल्ह्यात बोलबाला,जिल्हा परिषदेच्या शिवकन्यांच्या यशामुळे शाळा व तालुक्याचा मान उंचावला

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**



बीड येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय समूहनृत्य स्पर्धेत केजतालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सावळेश्वर पैठण च्या शिवकन्यांनी दैदिप्यमान यश संपादन करत जिल्ह्यात आपला ठसा उमटविला आहे.

लहान मुलींच्या गटातून सहभागी झालेल्या पैठण च्या विद्यार्थीनींनी उत्कृष्ट सादरीकरण करत द्वितीय क्रमांक पटकावला.त्यांच्या सुसंवाद,तालबद्धता आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे उपस्थित मान्यवर व प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली.या उल्लेखनीय यशाबद्दल तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री. सुनील केंद्रे,जेष्ठ शिक्षण विस्तारधिकारी दत्तात्रय चाटे,मुमताज पठाण मॅडम,पैठण केंद्राचे केंद्रप्रमुख अण्णासाहेब जाधव,केंद्रीय मुख्याध्यापक गोविंदराव मुळे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थीनींचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या यशामागे मार्गदर्शक शिक्षिका अनिता शिंदे मॅडम,बालासाहेब पौळ, बालासाहेब लोखंडे आणि श्रीनिवास गिरी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.पैठणच्या शिवकन्यांच्या या यशा मुळे शाळा व तालुक्याचा मान उंचावला असून सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077